संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवा काळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# प्रमाणबध्द लोकसंख्येसाठी धोरण आवश्यक

**भारतातील** लोकसंख्या हा भविष्यकाळात पुन्हा एकदा चर्चेचा आणि वादाचा मुद्दा ठरणार आहे. कारण गेल्या काही वर्षांत लोकसंख्येमध्ये विलक्षण स्वरुपाचे बदल घडून येतायत. लोकसंख्या वाढत असताना ती एका विशिष्ट गटाची वाढणार असून ते महिलांची संख्या कमी होण्यापर्यंत अनेक गोष्टींचा त्यात समावेश आहे. आजचे लोकसंख्येचे एकूण प्रमाण पाहिले तर त्यामध्ये १८ ते ३५ वयोगटातील तरुणांचा सर्वाधिक प्रमाण आहे. या युवाशक्तीचा वापर करून घेण्याची योग्य योजना आजही सरकारकडे नाही. तर पुढच्या पस्तीस वर्षात तरुणांची हीच सर्वाधिक संख्या भारतातील वृध्दत्वालाही जन्म देणारी ठरणार आहे. म्हणजे पुढच्या काही वर्षांमध्ये भारतातील लोकसंख्येचे इतके वेगवेगळे प्रभाव जाणवायला लागतील की, त्यासाठी स्वतंत्र लोकसंख्याविषयक धोरण सरकारला निर्माण करावे लागेल. ही बाब विशेषत्वाने लक्षात येण्यामागे कारणेही तशीच घडलेली आहेत. हरियाणा, पंजाब, महाराष्ट्र, राजस्थान, या भागात ज्याला कन्या भृण हत्या म्हणता येईल त्यांचे प्रमाण विलक्षण वेगाने वाढताना आढळून आले. महाराष्ट्रात सांगलीजवळ घडलेला प्रकार हे त्याचेच निदर्शक ठरतो. तर हरियाणा, बिहार, उत्तर प्रदेशमध्ये अल्पवयीन मुलींच्या विवाहाचे वाढत असलेले प्रमाण लोकसंख्या वाढीला प्रोत्साहन देणारे ठरत आहे. २०११ साली झालेल्या जनगणनेमध्ये हजार पुरुषांच्या मागे साडेनऊशे महिला असे प्रमाण वाढून आले होते. ते अलीकडे मोठ्या प्रमाणावर घटल्याचा अंदाज काही खाजगी स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केला आहे. हे प्रमाण जवळपास हजार पुरुषांमागे आठशे महिला इतके खाली आल्याचा धक्कादायक निष्कर्ष त्यांनी काढला आहे. सरकारी पातळीवर लोकसंख्या नियंत्रणाचे विशेष प्रयत्न होताना दिसत नाही. तर काही विशिष्ट योजना राबवून लोकसंख्या आवरण्याचा सरकारचा दावा इतका विश्वासार्ह वाटत नाही. शिक्षणाचा प्रसार होत असूनही लोकसंख्या वाढीचे प्रमाण लक्षणीयरित्या घटल्याचे पाहायला मिळत नाहीत. कदाचित या सगळ्या सावळ्या गोंधळाचा लाभ समाजातला काही विशिष्ट वर्ग घेताना दिसतो. आणि त्यातूनच लोकसंख्या वाढीचे व्यस्त प्रमाण आकाराला येत असावे. लोकसंख्येच्या या विचित्रपणातला सर्वाधिक धोकादायक भाग हाच आहे की स्त्री-पुरुष महिला , प्रमाण एका वेगळ्या वळणाकडे जात असल्याचे दिसते. समाजात होणारे भृण हत्येचे प्रमाण हा सामाजिक निरक्षरतेचा भयावह प्रकार ठरतो. तर हे प्रमाण समांतर ठेवण्यामध्ये सरकार कोणतेही धोरण राबवताना दिसत नाही.

### धर्मनिरपेक्षतावादी देशातील स्थिती

भारत हा धर्मनिरपेक्षतावादी देश जरी असला तरी धार्मिक कारणांमुळे लोकसंख्या आटोक्यात आणणे कठीण होत असल्याचे पाहायला मिळते. काही धर्मांमध्ये मुलासाठी धरला जाणारा आग्रह आणि त्यातून कन्या भृण हत्येचे वाढणारे प्रकार तर काही धर्मांमध्ये कुटुंब नियोजन हे कृत्यच धर्मविरोधी असल्याची दिली जाणारी शिकवणूक भारताला विचार करायला भाग पाडते. सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात जर जगाच्या बरोबरीने स्वतःचा विकास घडवायचा असेल किंवा महासत्तेच्या दिशेने प्रवास करायचा असेल तर सर्वप्रथम लोकसंख्याविषयक धोरणाची निश्चिती करावी लागेल.आपण लोकशाहीवादी देश कितीही स्वतःची पाठ थोपटून घेत असलो किंवा धर्मनिरपेक्षता वादाचा डांगोरा पिटत असलो तरीसुध्दा जगातल्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या या देशाला लोकसंख्या नियंत्रणाचे कोणतेच ठोस धोरण असू नये, याचे सर्वात मोठे आश्चर्य पडते. हे नसल्यामुळेच आज लोकसंख्या नियंत्रणापासून ते लोकसंख्येच्या प्रमाणाच्या सुसूत्रतेपर्यंत काही होताना दिसत नाही. प्रामुख्याने ज्या सामाजिक नीतिनियमांचा भाग म्हणून विवाह होतात. परंतु त्याच सामाजिकतेच्या नीतिमूल्यांना हरताळही फासला जातो. तेव्हा शासकीय स्तरावरच्या या धोरण लकव्याचा अनुभव येतो. एकूणच गेल्या पाच एक वर्षातला आलेख जर मांडला गेला तर महिला हा घटक सतत अन्यायग्रस्त आणि अत्याचारग्रस्त झालेला पाहायला मिळतो. एकीकडे स्त्री-पुरुष समानतेचे नारे दिले जातात. तर दुसरीकडे लोकसंख्येमधल्या या समानतेमध्ये अक्षम्य दुर्लक्ष केले जाते. सरकारी पातळीवर या सर्व गोष्टींची जाणीव असताना केले जाणारे दुर्लक्ष स्त्रीविषयक धोरणाचीच एक भृण हत्या ठरते. भविष्यकाळातील भारताच्या लोकसंख्येचे सुसूत्रीकरण करायचे असेल आणि त्यातही स्त्री संख्येचा दर वाढवायचा असेल तर फार मोठ्या प्रयत्नांची गरज आहे.

### समाजाकडून करावयाच्या गोष्टी

समाजाकडून काही गोष्टी करवून घ्याव्या लागत असतात. भारतासारख्या लोकशाहीवादी देशात या समाजव्यवस्थेचे नेतृत्व सरकार नावाची संस्था करीत असते. मात्र याकरिता या सरकार नावाच्या संस्थेत तितकीच संवेदनशीलताही असावी लागते. महाराष्ट्रात सांगलीजवळ अनेक अर्भकांचे जीव घेणारा प्रकार घडला असतानाही राज्य सरकारी पातळीवर कोणत्याही वेगाने हालचाली घडल्या नाहीत. कायदा किंवा नियमाप्रमाणे संबंधित डॉक्टरला अटक झालेली आहे. परंतु अर्भकांच्या जीव घेण्याचे दहा वीस प्रकार घडत असतानाही त्या त्या परिसरातील शासकीय यंत्रणा किंवा पोलीस यंत्रणा काय करत होत्या, असा प्रश्न निर्माण होतो. समाजातला एक विशिष्ट वर्ग अंधश्रध्दांवर विश्वास ठेवून जेव्हा अशा अर्भकांच्या नाशासाठी पुढाकार घेतो आणि त्यावेळेला त्या भागातील विचार करणारा वर्गदेखील जेव्हा मौन बाळगतो तेव्हा हीदेखील एक मोठी शोकांतिका ठरते. जर खरोखरच भारतात स्त्री-पुरुष समानतेचे प्रयत्न करायचे असतील तर सरकारी पातळीवर त्याची सुरुवात करावी लागेल. राजकीय इच्छाशक्ती दाखवावी लागेल. केवळ लोकप्रिय घोषणांच्या वल्गना न करता; आहे त्या लोकसंख्येला सर्वार्थाने साक्षर करणे, प्रमाणबध्द लोकसंख्येविषयी साक्षरता निर्माण करणे अशा काही स्तरांवर त्याचा पाठपुरावा करावा लागेल. एक गोष्ट मात्र शंभर टक्के निश्चित आहे की, या सर्व गोष्टींच्या घटकांचा एकत्रित विचार करण्याकरिता प्रमाणबध्द लोकसंख्येसाठी अभ्यासपूर्ण धोरणाची अनिवार्यता सिध्द होते.